*खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे*

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

*मराठी विभाग आयोजित*

## मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने वाचन पंधरवड्याचे आयोजन

दि. १ ते १५ ऑक्टोबर २०१६

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करताना दि. १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान वाचन पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने वाचन संस्कृतीच्या प्रचार व प्रसारासाठी निबंधस्पर्धा , दिवाळी अंक भेट, व्याख्यान, चर्चासत्र, परिसंवाद, प्रश्नमंजूषा, ग्रंथपरिचय, ग्रंथालय भेट , ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शन आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रास्ताविकात **मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ संजय शिंदे** यांनी या वाचन प्रेरणा दिनानिमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची अभिरुची निर्माण व्हावी ,विद्यार्थ्यांचा वाचनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलावा व वाचनाच्या माध्यमातून अभिरुचीसंपन्न मनोरंजन होऊ शकते अशी भावना वाढीस लागावी यासाठी या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.

**डॉ तानाजी गिते** यांनी वाचन संस्कार हवाच या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाचन हा माणसाच्या बौद्धिक संस्कारांचा पाया असून वाचनातून जीवनावश्यक विचारांचे संस्कार अधिक होत असतात. विद्यार्थी, शिक्षक आणि सामान्य माणूस अशा सर्वांच्याच आयुष्यात वाचनाचे स्थान महत्त्वाचे असते. वाचन संस्कृतीच्या माध्यमातून वैचारिक अभिरुची असलेला प्रगल्भ समाज घडविण्यासाठी वाचन संस्कार हवाच असे सांगितले. **प्रा अनिल कुलकर्णी** यांनी वाचनाचे व्यक्तिमत्त्व विकासातील स्थान या विषयावर बोलताना वाचनामुळे आयुष्याविषयीचा सकारात्मक व आशयसंपन्न दृष्टिकोन तयार होत असून वाचनामुळे व्यक्तीला जगण्याचे भान येते. त्याची समज वाढते. तो बहुश्रुत होतो असे सांगितले. **माझे आवडते पुस्तक** या विषयावर आयोजित निबंधस्पर्धेत ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये संदीप देशमुख याचा प्रथम क्रमांक, दिगंबर गायकवाड याचा व्दितीय क्रमांक तर कल्पेश घोलप याचा तृतीय क्रमांक आला. त्यांना प्रेरणादायी पुस्तके भेट देऊन त्यांचा डॉ तानाजी गिते , प्रा ए. जी. कुलकर्णी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ एस. बी. पाटील यांच्या हस्ते साधना साप्ताहिकाचा युवा दिवाळी अंक भेट देऊन त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. **वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे का** या विषयावर आयोजित परिसंवादात चर्चा करताना विद्यार्थ्यांनी पालकांमध्ये वाचनासंबंधीची उदासीनता ,शाळांमधील ग्रंथालयांची दुरावस्था , सोशल मीडियापासून मनोरंजनांच्या अनेक साधनांचा वाढता प्रभाव , शिक्षकांचे अवांतर वाचनाबद्दल न मिळणारे प्रोत्साहन आदी मुद्द्यांवर भर दिला. या वेळी विश्वास नांगरेपाटील लिखित मन में हैं विश्वास या आत्मकथनात्मक पुस्तकाचे विद्यार्थ्यांनी अभिवाचन केले.

डॉ. संजय शिंदे
मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख



**माझे आवडते पुस्तक** या स्पर्धेतील विजेत्यांना पुस्तक भेट देताना डॉ.टी.जी.गीते व प्रा.ए.जी.कुलकर्णी




**माझे आवडते पुस्तक** या स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेता संदीप देशमुख



महाविद्यालयातील ग्रंथालयाला भेट देताना मराठी विभागातील विद्यार्थी



वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध साहित्यिक स्पर्धांमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना साधना साप्ताहिकाचा युवा दिवाळी अंक भेट देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील

पुणे जिल्हा उत्तर ४ पुढारी | पुणे, रविवार १६ ऑक्टोबर २०१६

# राजगुरू महाविद्यालयात पंधरवड्याच्या वाचनाचे आयोजन

राजगुरुनगर : प्रतिनिधी

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करताना दि. १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान पंधरवड्याच्या वाचनाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने वाचन संस्कृतीचा प्रचार व प्रसारासाठी निबंध स्पर्धा, दिवाळी अंक भेट, व्याख्याने, चर्चासत्र, परिसंवाद, प्रश्नमंजुषा, ग्रंथपरिचय, ग्रंथालय भेट, ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शन आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

डॉ. तानाजी गिते यांनी 'वाचन संस्कार हवाच' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वाचन हा माणसाच्या बौद्धिक संस्कारांचा पाया असून वाचनातून जीवनावश्यक विचारांचे संस्कार अधिक होत असतात. विद्यार्थी, शिक्षक आणि सामान्य माणूस अशा सर्वांच्याच आयुष्यात वाचनाचे स्थान महत्त्वाचे असते. वाचन संस्कृतीच्या माध्यमातून वैचारिक अभिरुची असलेला प्रगल्भ समाज घडविण्यासाठी वाचन संस्कार हवाच, असे सांगितले.

'व्यक्तिमत्त्व विकासातील स्थान' या विषयावर बोलताना वाचनामुळे आयुष्याविषयीचा सकारात्मक व आत्मसंपन्न दृष्टिकोन तयार होत असून, वाचनामुळे व्यक्तीला जगण्याचे भान येते. त्याची समज वाढते. तो बहुश्रुत होतो, असे प्रा. अनिल कुलकर्णी यांनी सांगितले. प्रास्ताविक मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले.

'माझे आवडते पुस्तक' या विषयावर आयोजित निबंध स्पर्धेत ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये प्रथम क्रमांक संदीप देशमुख, द्वितीय क्रमांक दिगंबर गायकवाड, तृतीय क्रमांक कल्पेश घोलप या विद्यार्थ्यांचा आला. त्यांना प्रेरणादायी पुस्तके भेट देऊन त्यांचा डॉ. तानाजी गिते, प्रा. ए. जी. कुलकर्णी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांच्या हस्ते साधना साप्ताहिकाचा युवा दिवाळी अंक भेट देऊन त्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

'वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे का' या विषयावर आयोजित परिसंवादात चर्चा करताना विद्यार्थ्यांनी पालकांमध्ये वाचनासंबंधीची उदासीनता, शाळांमधील ग्रंथालयांची दुरवस्था, सोशल मीडियासारख्या मनोरंजनाच्या अनेक साधनांचा वाढता प्रभाव, शिक्षकांचे अवांतर वाचनाबद्दल न मिळणारे प्रोत्साहन आदी मुद्द्यांवर भर दिला. या वेळी विश्वास नांगरेपाटील लिखित 'मन में है विश्वास' या आत्मकथनात्मक पुस्तकाचे विद्यार्थ्यांनी अभिवाचन केले. याशिवाय काव्यवाचन, आवडत्या पुस्तकाबद्दल मनोगत, वृत्तपत्रातील अग्रलेखाचे वाचन, साहित्यिक प्रश्नमंजुषा अशा विविध कार्यक्रमांमध्ये श्वेता घनवट, आकांक्षा वाडेकर, काजल हगुडे, विशाखा ठाकर, पूनम शिंदे, असमा पठाण, कोमल रासकर, धनश्री काळे, निखिल बोरकर, स्वप्नील जरे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



निबंध स्पर्धेतील बक्षीसपात्र विद्यार्थी.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात तृतीय वर्ष कला शाखेतील मराठीचे विशेष स्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील ग्रंथालयाला भेट देऊन अनेक पुस्तकांशी परिचय करून घेतला. महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या वतीने पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. त्यात अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी वाढदिवसानिमित्त एकमेकांना पुस्तक भेट देण्याचा व दिवाळीत सुट्टीत किमान ५ अवांतर पुस्तके वाचण्याचा संकल्प केला.

या सर्व कार्यक्रमांचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. संजय शिंदे, ग्रंथपाल प्रा. पी. व्ही. ताजकीर, प्रा. किरण गाढवे यांनी केले.

वृत्तपत्रातील प्रसिद्धी

डॉ.बी.डी.अनुसे
मराठी विभाग प्रमुख